*Pudhari page no. 2 , 13th February 2012*

# मराठा चेंबरच्या 'इंडियन डेलिगेशन टू हॅनोव्हर'साठी नोंदणी सुरू

**पुणे :** मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अ‍ॅण्ड अ‍ॅग्रिकल्चरने आपल्या 'इंडियन डेलिगेशन टू हॅनोव्हर' या उपक्रमासाठी नावनोंदणी सुरू केली आहे.

लघु आणि मध्यम उद्योजकांसाठी उपयुक्त असलेल्या या उपक्रमात विविध क्षेत्रांतील लोकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन चेंबरतर्फे करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत 'टेक्नॉलॉजी मीटस् प्रोग्रेस' या औद्योगिक तंत्रज्ञान प्रदर्शनासाठी पहिले भारतीय शिष्टमंडळ २३ ते २९ एप्रिल २०१२ दरम्यान हॅनोव्हरला रवाना होणार आहेत. या प्रदर्शनात जगभरातील नवनवीन तंत्रज्ञान पहिल्यांदाच प्रदर्शित करण्यात येणार आहे.

या शिष्टमंडळात सहभागी होण्यासाठी चेंबरकडे नावनोंदणी करण्याची आवश्यकता असून, २५ फेब्रुवारी २०१२ पर्यंत नावनोंदणी सुरू राहणार आहे.